● गुरुवार, दि १२ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनस्नहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## आष्टी ते पांडेपोखरी रस्त्याकरिता दहा कोटींचा निधी

### आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रयत्न; रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात!


**आष्टी । प्रतिनिधी -** लोकप्रिय लोकनेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार मा. श्री बबनराव लोणीकर साहेब यांच्या विशेष पर्यत्नातून आष्टी ते पांडेपोखरी रस्त्याच्या खडीकरण मजबुतीकरण व डांबरीकरण कामाकरिता दहा कोटी रुपये अर्थसंकल्पात मंजूर झाले आहे. आष्टी ते पांडेपोखरी दहा किलोमीटर या रस्त्याच्या प्रत्यक्ष काम काल दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी एक वाजता सुरू झाले आहे.

मुंजाबाबा थोरात, झानेश्वर आसाराम थोरात, अचित निबंक राऊत, मुकुंदा किसन थोरात, विष्णू अंकुश थोरात, दगडू रामराव राऊत, शिवाजी उत्तमराव राऊत, विष्णू अंकुश थोरात, वैभव केशवराव भोरात, संभाजी सवणे, साबिकराम आगलावे, बाबासाहेब राऊत या आष्टी येथील नागरिकांनी या रस्त्याचे काम लवकर सुरू व्हावी याकरिता उपोषण केली होते. काल या उपोषणकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांची भेट घेऊन रस्त्याचे काम चालू करण्याची विनंती केली होती. त्यांच्या विनंतीची दखल घेऊन आमदार लोणीकरांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे ताबडतोब काम चालू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या वेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले तुकाअबा सोळंके जिल्हा परिषद सदस्य सुदाम प्रधान पंचायत समिती सभापती रंगनाथ येवले कृषी उत्पन्न बाजार **पान २ वर**



## पवार कुटुंबियांची दीडशे वर्षांची परंपरा कायम

## टेंभुर्णीत केळीच्या पानांची महालक्ष्मी!



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** येथील शिक्षक प्रमोद पवार यांच्या कुटुंबीयांनी पवार परिवाराची सुमारे १५० वर्षांपासूनची परंपरागत केळीची महालक्ष्मी स्थापण करण्याची परंपरा या ही वर्षी कायम ठेवली आहे. सुमारे दीडशे वर्षापासून टेंभुर्णी नगरीतील केळीच्या पानाची ही महालक्ष्मी ही स्थापना केल्या जात. टेंभुर्णीच्या पवार घराण्याची परंपरा. केळीच्या पानावर सुंदर मूर्ती रेखाटल्या जाते. वैभव महालक्ष्मीचा अवतार म्हणून या गौराईकडे पाहिल्या जाते. आदराने आणि भक्ती भावाने व श्रद्धेने या महालक्ष्मीच्या पूजनासाठी व दर्शनासाठी टेंभुर्णी तील सर्व भाविक भक्त या पवार कुटुंबाच्या घराकडे येत असतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पवार कुटुंब आणि महालक्ष्मीची केळीच्या पानाची मूर्ती स्थापन केलेली आहे.आमची ही गौरी फक्त एकच दिवसांची असते व तिचे पावित्र्य राखण्यासाठी दरवर्षी तिचे विसर्जन करुन नवीन गौरीची स्थापना करण्यात येते.अशी ही पवार परिवाराची परंपरागत एकमेव गौरी असल्यामुळे परिसरातील भाविक मोठ्या कुतुहलाने व भक्तीभावाने या ठिकाणी दर्शनासाठी येत असतातअसे श्रीमती किर्ती पवार यांनी सांगितले. पवार कुटुंबाकडेच एकमेव या केळीच्या पानाची मूर्ती स्थापन केलेली असल्याने टेंभुर्णी नगरीत महालक्ष्मीचं हे वैशिष्ट्य आहे.

## विविध राजकिय पक्षातील पदाधिकारी शिवसेनेत

### मंठा तालुकाध्यक्ष उदयसिंह बोराडे यांची प्रमुख उपस्थिती

**मंठा । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात वातावरण निर्मितीस सुरुवात झाली असून राजकीय घडाम ोडींना वेग आला आहे.विविध राजकीय पक्षांतील राजकीय पदाधिकाऱ्यांची पसंती शिंदेंच्या शिवसेनेला मिळताना दिसत आहे. आठवड्यातील तिसरी इंनकमिंग तालुकाप्रम ुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन बुधवार ( दि.११ रोजी) शिवसेना संपर्क कार्यालयात पार पडली. नायगाव येथील माजी सरपंच प्रल्हाद सांगळेयांच्या नेतृत्वात माजी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप राठोड,संपत आढे, शंकर राठोड, नारायण राठोड, महेश राठोड, समाधान राठोड, गणेश राठोड, रामेश्वर राठोड, विनोद राठोड, गणेश घुगे, गजानन राठोड, सुनील राठोड, भगवान राठोड, **पान २ वर**



युवा आदर्श

### गणेश गौरी ...

**गणेश चतुर्थी पावन**
**घराघरात आला गणूं**
**तुज समवेत गौरी येई**
**पुलकित हो अणूरेणूं**
**स्वर्गस्वरुप गृहामाजी**
**आम्हांवरी वृध्दीऋणूं**
**विनंती पाप क्षय करी**
**अंगात रुजवे सद्गुणूं**
**प्रार्थी तुज विशालतनू**
**उदात्ततादे अंत:करणू**
**गौरीगणेश आगमनाने**
**दिवाळी गृहा येई जणूं**
**शास्त्रशुद्ध अर्थ पूर्ण रे**
**गणेशोत्सव भिन्न सणूं**
**बुध्दी देवाची महानता**
**अखर्व ते असंख्ये गुणूं**
**गणाधिशांचे रुपाद्भुत**
**अल्पबुध्दी मी कसेवर्णू**
**न मागता देशी भरभरू**
**धन्यवाद ते काय म्हणूं**
**प्रसन्न चित्ते घरी विराजे**
**भाग्याले भावाने गुणूं**
**दु:ख भंजतो दु:ख हर्ता**
**कशाला वेदनेत व्हणूं**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## 'जल जीवन मिशन' व 'स्वच्छ भारत अभियाना'ची अंमलबजावणी गतीने करावी - मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्यात पाणी पुरवठा योजनांची अनेक कामे जल जीवन मिशन अंतर्गत सुरू आहे. या मिशनअंतर्गत प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवायचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालयांची उभारणी, वैयक्तिक घरकुले शौचालयांची कामे पूर्ण करावीत. जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीला गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत **पान २ वर**

## शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावू - अजित पवार

**मुंबई । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे ही राज्य आणि केंद्र शासनाची भूमिका असून सोयाबीन व कापसाचा हमीभाव वाढवण्यासाठी, तसेच निर्यातीस परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारने अनुकुलता दर्शविली आहे. ऊसाचा एमएसपी वाढवून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कठोर भूमिका घेतली असून त्याचे सकारात्मक परिणाम **पान २ वर**

## मराठवाडा शिक्षक संघाचे प्रेमदास राठोड यांचा आझाद मैदानावरील आंदोलनात सक्रिय सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा शिक्षक संघ आझाद मैदान मुंबई येथे टप्पा अनुदान, जुनी पेन्शन योजना यासाठी आंदोलनासाठी बसलेल्या शिक्षक संघटनेच्या आंदोलनात मराठवाडा शिक्षक संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना आश्वासित केले की मराठवाडा शिक्षक संघटना नेहमी शिक्षकांच्या पाठीशी उभी असते ती आताही तुमच्या पाठीशी उभी आहे आणि आम्ही शिक्षक संघटनेच्या मार्फत तुमच्या पाठीमागे त्यासाठी आंदोलनात सहभागी होत आहोत. टप्पा अनुदान असेल शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी मराठवाडा शिक्षक संघटना नेहमीच रस्त्यावर उतरते. विविध **पान २ वर**



## मूल्य संस्काराची रुजवत कुटुंबातूनच करावी - साहित्यिक प्रा. कोरे

### स्व. दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिनानिमित्त मार्गदर्शन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** आजची सामाजिक परिस्थिती पाहता नकारात्मक सूरच दिसून येतो. हेवेदावे स्वार्थी वृत्तीने माणूसपण हरवत चालले आहे. मनामनात सकारात्मक विचारांची बीजे पेरायची असतील तर कुटूंबातूनच जाणीवपूर्वक मुलांवर मूल्यसंस्कार रुजविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आजच्या सम ाजस्थितीला साने गुरुजींच्या मानवता अन समाजवादी विचारांची अपरिहार्यता ठरते, असे प्रतिपादन साने गुरुजी कथाम ाला संस्काराचे वारकरी महोत्सव समि तीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा. बसवराज कोरे यांनी केले. शहरातील अंबड रोड परिसरातील यशवंतनगरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात हेलस साने गुरुजी कथामालज्ञ शाखेचे संस्थापक अध्यक्ष स्व. दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिन अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रसेवा दलाचे ज्येष्ठ पदाधिकारी डॉ. नारायण बोराडे, प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे, डॉ. सुहास सदाव्रते, डॉ. दिगंबर दाते, संतोष लिंगायत, **पान २ वर**

## मौजपुरीतील पहेलवानाने मारली बाजी

### कुस्तीत अजिंक्य ढोकळे तालुक्यात पहिला



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजपुरी येथील अजिंक्य सत्यनारायण ढोकळे या विद्यार्थ्याने तालुका स्तरावर घेण्यात आलेल्या ४१ वजन गटात १४ वर्षाखालील कुस्ती स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रम ांक पटकावलाय. त्याची आता पुढील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने नुकत्याच शालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. दरम्यान या स्पर्धेत मौजपुरी येथील अजिंक्य सत्यनारायण ढोकळे या विद्यार्थ्याने रंगतदार कुस्ती करीत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी कुस्तीचा डाव खेळेत अजिंक्य ढोकळे याने प्रतिस्पर्धकाला चितपट करीत कुस्ती जिंकली. तालुका स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत अजिंक्य ढोकळे याने प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला आहे. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, सरपंच बद्रीणारायण भसांडे, सत्यनारायण ढोकळे, बालाजी बळप, अंकुश काळे, अच्युत मोरे, कृष्णा हिवाळे यांच्या सह गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

# संपादकीय

## २५ वर्षानंतर पाकची कबुली

जी गोष्ट पाकिस्तान आजवर नाकारीत आला ती गोष्ट पाकिस्तानने २५ वर्षानंतर का होईना अखेर मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिक दिनाच्या निमित्ताने पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात मारले गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या बलिदानाची आठवण काढत त्यांना श्रध्दांजली वाहिली आणि २५ वर्षापासून पाकिस्तान जी गोष्ट नाकारीत आलाय त्याची न कळत कबुली दिली. १९९९ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानशी मैत्री करण्यासाठी मैत्रीचा हात पुढे केला. दोन्ही देशात पन्नास वर्षापासून सुरू असलेला तणाव कमी करण्यासाठी वाजपेयींनी प्रामाणिक प्रयत्न केले. दोन्ही देशांचे संबंध सुधरावेत म्हणून त्यांनी दिल्ली लाहोर बस सेवा सुरू केली . दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आणि कटुता कमी झाली असे वाटत असतानाच पाकिस्तानने आपला मूळ रंग दाखवला आणि भारताचा विश्वासघात केला. १९९९ च्या कडाक्याच्या थंडीत जम्मू काश्मीर मध्ये बर्फ पडत असल्याचा फायदा घेऊन कारगिल मधील उंचावर असलेल्या कारगिलमध्ये घुसखोरी करून बंकर उभारले आणि त्यात पाकिस्तानी सैनिकांना घुसवले. त्यांनी कारगिलच्या बऱ्याच भागात अतिक्रमण केले आणि तो भूभाग बळकावत भारतीय सनिकांवर आक्रमण केले. भारतीयांसाठी हा मोठा धक्का होता कारण पाकिस्तान असा विश्वासघात करेल असे कोणालाच वाटले नव्हते शिवाय कारगिल मधील परिस्थिती भारतीयांसाठी अनुकूल नव्हती. शत्रुसैन्य उंचीवर असल्याने शत्रू सैन्याच्या गोळीबाराचा मुकाबला करत आल्या सैनिकांना पहाडावर चढावे लागत होते. भारतीय सैन्य अतिशय विपरीत परिस्थितीत शत्रूला धैर्याने तोंड देत होते पण परिस्थिती अनुकूल नव्हती अखेर केंद्र सरकारने हवाई दलाला पाचारण केले. हवाई दलाने लेझर बॉम्बने पाकिस्तानी सैनिकांचे बंकर उध्वस्त केले. कॅप्टन विक्रम बात्रा व त्यांच्या युनिटने मोठी मर्दुमकी गाजवून पाकड्यांना भारताबाहेर हुसकावून लावले. दोन महिने चाललेल्या या युद्धात पाकिस्तान नामोहरम झाला. या युद्धात भारताचे अनेक जवान शहीद झाले. भारताने पाकड्यांना कारगिल मधून हुसकावून लावल्यावर भारतीय सैन्य पाकिस्तानमध्ये घुसेल अशी भीती वाटू लागल्यावर पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी थेट अमेरिका गाठत अमेरिकेला मध्यस्ती करण्याची विनंती केली. अमेरिकेच्या मध्यस्ती नंतर भारताने युद्ध थांबवले. या युद्धात पाकिस्तानची नाचक्की झाली पण पाकिस्तानने कारगिल मध्ये घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैनिक नसून मुजाहिदीन असल्याची आरोळी ठोकली. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तान कायम हेच सांगत आला की कारगिल मध्ये पाकिस्तानी सैन्य नव्हतेच भारताने मात्र त्याचा कायम प्रतिवाद करत घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैन्यच असल्याची ठाम भूमिका घेतली. पाकिस्तान मात्र हे नाकारीत राहिला. पण म्हणतात ना सत्य केंव्हा ना केंव्हा तरी मान्य करावीच लागते. आता २५ वर्षानंतर का होईना पाकिस्तानने सत्य मान्य केले. पाकिस्तान विश्वास घातकी आहे असे भारत आंतरराष्ट्रीय समुदायाला जे सांगत आलाय ते २५ वर्षानंतर का होईना पण खरे ठरले.

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मरावे परी देहरुपी उरावे..; चला मरणानंतरही जिवंत राहूया!

कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी रचलेल्या कवितेतील पुढील ओळी जीवनाचा खरा अर्थ उमजावणारी आहे

आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं..
रिकामं तर रिकामं, लिहिलं तर छान असतं
शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं
मधली पानं आपणच भरायची असतात
तेच आपलं कर्म असतं!

या कवितेचा भावार्थ लक्षात घेतल्यावर आपल्याला आयुष्याचा खरा अर्थ उमगतो. आपण रक्तदान, अवयवदान यासारख्या कृतीमुळे आपल्याला जिवंतपणी रक्तदान करुन आणि आपल्या मरणानंतर अवयवदान करुन मानव धर्माचे खऱ्या अर्थाने पालन करण्याची संधी प्राप्त होते. म्हणूनच आजच्या या लेखातून अवयवदान व त्याचे महत्व समजून घेवूया आणि पुढील आयुष्यासाठी मानवी दृष्टीकोनातून योग्य तो निर्णय घेवूया!

अवयवदान म्हणजे काय?

जिवंतपणी अथवा मृत झाल्यानंतर आपले अवयव दुसऱ्या व्यक्तीला देणे म्हणजे अवयवदान होय.

अवयवदान श्रेष्ठदान असून ज्याद्वारे आपण मृत्यूनंतर आपले अवयवदान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अवयव निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतो.

ज्या रुग्णांचे अवयव कायमस्वरूपी निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांसाठी अवयवदान हाच एक आशेचा किरण आहे.

अवयवदान प्रत्यारोपण प्रतिरूप म्हणजे काय?

मानवी अवयव प्रत्यारोपण म्हणजे आधुनिक वैद्यकीय शास्त्राची एक मोठी उपलब्धी आहे. या उपचारात एखाद्या जिवंत वा मृत व्यक्तीचा अवयव अथवा अवयवाचा काही भाग शस्त्रक्रियेद्वारे विलग करून तो एखाद्या गरजवंत रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करतात. ज्यांचा एखादा अवयव कायमस्वरूपी निकामी झाला आहे, अशा रुग्णांसाठी ही प्रमाणित व उपलब्ध अशी उपचार पद्धती आहे.

आपण कोणत्या अवयवांचे दान करू शकतो?

मेंदू स्तंभ मृत्यू (Brain Death)- मृत व्यक्तीची हृदयक्रिया चालू आहे पण तिचा मृत्यू झाला आहे, अशी व्यक्ती बहुतेक प्रमुख अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, हृदय, आतडी, डोळे, त्वचा, हृदयाची झडप आणि कानाचे डम यांचेदेखील दान करू शकते.

सामान्य मृत्यू (Normal Death)- मृत व्यक्तीची जिची हृदयक्रिया बंद पडली आहे, अशी व्यक्ती फक्त डोळे व त्वचा या अवयवांचे दान करू शकते.

जिवंत व्यक्ती (Live Donor)- जिवंत व्यक्ती फक्त आपल्या जवळच्या नातेवाईकांसाठीच अवयवदान करू शकते.

रुग्ण दात्याचे जवळचे नातेवाईक म्हणजे आजी, आजोबा, नातू, मुलगी, मुलगा, आई-वडील, भाऊ-बहीण अथवा पती किंवा पत्नी हे असावे लागतात.

या व्यतिरिक्त कोणालाही रुग्णासाठी अवयवदान करायचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते.

शासन रुग्ण व दाता यामध्ये काही आर्थिक देवाण-घेवाण नसून फक्त प्रेम व स्नेह या नात्यानेच अवयवदान होत आहे,याची खात्री झाल्यावरच परवानगी देते.

जिवंत व्यक्ती फक्त काही मर्यादित अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड अथवा यकृताचा काही भाग दान करू शकतो.

मस्तिष्क मृत्यू म्हणजे काय?

वैद्यकीय शास्त्रानुसार एखाद्या व्यक्तीची चेतना व श्वासोच्छवास कायमस्वरूपी बंद झाल्यास त्याला मृत घोषित करता येते.

या दोन्हीचे केंद्र आपल्या मेंदूतील मस्तिष्क स्तंभ या भागात असतो.

अपघातात डोक्याला मार लागल्यास मेंदूत रक्तस्राव झाल्याने अथवा मेंदूच्या शस्त्रक्रियेनंतर मस्तिष्क स्तंभास कायमस्वरूपी इजा झाल्यास या व्यक्तीचा मस्तिष्क स्तंभ मृत्यू होऊ शकतो.

एखाद्या व्यक्तीचे अतिदक्षता विभागात उपकरणांच्या सहाय्याने हृदय कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवले असेल तसेच काही ठराविक प्रमाणात चाचण्यांच्या आधारे तिचा मस्तिष्क स्तंभ मृत झाल्याचे निश्चित झाले तर त्या व्यक्तीस मृत घोषित करता येते.

अशा व्यक्तीचे हृदय जास्तीत जास्त १६ ते ७२ तासापर्यंत कृत्रिम रित्या क्रियाशील ठेवता येते व याच कालावधीत प्रमुख अंतर्गत अवयवांचे दान होऊ शकते.

यासाठी त्या रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक असते.

असे अवयवदान फक्त शासनाने प्रतिरोपणासाठी मान्यता दिलेल्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मस्तिष्क स्तंभ मृत्यू झाल्यासच असू शकतो.

मस्तिष्क स्तंभ मृत्त अथवा ब्रेन डेड व्यक्ती जगण्याची काही शक्यता असते का? या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे.

एखाद्या व्यक्तीस मस्तिष्क स्तंभ मृत्यू अथवा ब्रेन डेड घोषित केले असेल तर ती व्यक्ती जगण्याची शक्यता अजिबात नसते व ती व्यक्ती मृत असते.

मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती व कोमातील रुग्ण यामध्ये फरक आहे.

कोमातील रुग्ण मृत नसतात व ते परत जगण्याची शक्यता असते. तसेच मस्तिष्क स्तंभ मृत घोषित करणे म्हणजे इच्छामरण असे बिलकुल नाही.

मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती ही मृत असते.

अवयवदान करायचे असल्यास मृत्यू हा रुग्णालयात येणे गरजेचे आहे का? याचे उत्तर होय आहे.

मस्तिष्क स्तंभ मृत्यू हा प्रतिरोपणासाठी मान्यता असलेल्या रुग्णालयातच घोषित करता येत असल्याने अशा रूग्णालयातील अतिदक्षता विभागातच मृत्यू झाल्यास अवयवांचे दान होऊ शकते.

परंतु डोळे व त्वचा यांचे दान मृत्यूनंतर सहा तासापर्यंत घरी मृत्यू झाला असेल तरी होऊ शकते.

मस्तिष्क स्तंभ मृत्यू घोषित करणे व अवयवदान कायदेशीर आहे का? याचे उत्तर होय असे आहे.

भारतामध्ये मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ नुसार नुसार मस्तिष्क स्तंभ मृत्यू व अवयवदान या दोन्हींना मान्यता दिली आहे. या कायद्याची खालील विशेष उद्दिष्टे आहेत-

मस्तिष्क स्तंभ मृत्यूला मान्यता देणे जेणेकरून मृत्यूनंतर अवयवदान होऊ शकेल.

रुग्णांच्या उपचारासाठी मृत व्यक्तीचे अवयव काढणे, साठविणे व प्रतिरोपण करणे, यावर नियंत्रण ठेवणे.

मानवी अवयवांच्या व्यापारावर प्रतिबंध घालणे, कायद्याने अवयव विकणे व विकत घेणे व त्यासाठी जाहिरात करणे किंवा अवयव मिळवून देण्यासाठी व्यापारी तत्त्वावर मध्यस्थी करणे, यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

अवयवदानानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे शरीर त्यांच्या नातेवाईकांना परत दिले जाते का? होय.

मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे अवयव काढल्यानंतर त्यांचे शरीर सन्मानपूर्वक त्यांच्या नातेवाईकांना अंत्यविधीसाठी परत दिले जाते.

अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. देहदानामध्ये मृताचे शरीर वैद्यकीय प्रशिक्षणासाठी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ठेवून घेतले जाते तर अवयवदानमधील अवयव प्रत्यारोपणासाठी वापरले जातात व शरीर नातेवाईकांना परत केले जाते.

दान केलेल्या अवयवांचे वितरण कसे होते, ते फक्त श्रीमंत व्यक्तींनाच दिले जातात का? याचे उत्तर नाही असे आहे.

गरजू रूग्णांचे वय, रक्तगट त्यांच्या आजाराची तीव्रता, ते किती दिवस अवयवांची प्रतिक्षा करीत आहेत, त्यांची वैद्यकीय गरज या सर्वांसाठी प्रत्येक रुग्णास गुण दिले जातात. या सर्व गरजू रूग्णांची एक सामायिक प्रतिक्षा यादी केली जाते व सर्वाधिक गरजू रुग्णास अवयव दिला जातो. रुग्णांची आर्थिक स्थिती, त्यांची जात व धर्म, याची प्रतिक्षा यादीत त्यांचे स्थान ठरविताना काही संबंध नसतो.

अवयवांचे वितरण हे महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती यांच्यामार्फत पारदर्शकपणे होते.

मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या नातेवाईकांना अवयव कोणाला दिले आहेत हे कळू शकते का? याचे उत्तर नाही असे आहे.

नातेवाईकांना अवयव मिळालेल्या रुग्णाचे नाव व पत्ता सांगितला जात नाही.

अवयवदान केल्याने मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या शरीरावर काही विद्रूपता येते का? याचे उत्तर नाही असे आहे.

मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्यास ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन त्याचे अवयव काळजीपूर्वक काढले जातात व शरीरावर विद्रूपता येत नाही. एखाद्या व्यक्तीची शस्त्रक्रिया जितक्या काळजीपूर्वकरित्या केली जाते, तितक्याच काळजीपूर्वकरित्या मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्याचे अवयव काढले जातात, जखम पुन्हा शिवली जाते. शरीरावर, पोटावर अथवा छातीवर शस्त्रक्रिया केल्याचे टाके मात्र राहतात.

अवयवदानाला धर्माची परवानगी आहे का? याचे उत्तर होय असे आहे.

भारतातील सर्व धर्मांनी अवयवदानाला पाठिंबा दिला आहे व अवयवदान हे एक पुण्याचे काम मानले आहे.

अवयवदान केल्यानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला काही मोबदला दिला जातो का? याचे उत्तर नाही असे आहे.

अवयवदानासाठी मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाचा मोबदला दिला जात नाही. म्हणून अवयवदान हे शुद्ध व श्रेष्ठ ठरते. परंतु अवयवदानाला संमती दिल्यानंतर अवयवदानासाठी करण्यात येणाऱ्या चाचण्यांचा तसेच इतर काही वैद्यकीय खर्च मृतांच्या नातेवाईकांना करावा लागत नाही.

**अवयवदान करायची इच्छा असल्यास काय करावे?**

एखाद्या व्यक्तीस मृत्यूनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या सज्ञान नातेवाईकांची सही घेणे देखील आवश्यक आहे. असा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल.

हे कार्ड दात्याने सतत आपल्याजवळ बाळगावे. जेणेकरून त्यांच्या नातेवाईकांना अथवा मित्रपरिवाराला त्याच्या अवयवदान करण्याच्या इच्छेविषयी माहिती होईल.

जरी आपण डोनर कार्डवर सही केली असली तरी आपल्या मृत्यूनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या संमतीशिवाय अवयवदान होवू शकत नाही, म्हणून आपल्या अवयवदानाच्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिती असणे आवश्यक आहे.

अवयवदानाविषयीची अधिक विस्तृत माहिती www.dmer.org, www.notto.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेच. त्याशिवाय डोनर कार्ड व अवयवदानासंबंधी माहिती देण्यासाठी

विभागीय स्तरावर मुंबई येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, एल.टी.एम.जी. हॉस्पिटल (सायन हॉस्पिटल) कॉलेज बिल्डिंग, दुसरा मजला, औषध भांडाराच्या बाजूला, सायन (पश्चिम) मुंबई-२२, (www.ztccmumbai.org),

विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, पुणे द्वारा के. ई.एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे-१, (www.ztccpune.org),

विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, औरंगाबाद, नॅफ्रॉलॉजी विभाग, एम.जी.एम.मेडिकल कॉलेज, एन-६, सिडको, औरंगाबाद ४३१००३,

विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती,नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मनेवाडा, नागपूर-४४०००३ येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती कार्यरत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार माधव संताजी अटकोरे (मो.८०८७५६५१७२) यांनी या विषयावर अवयवदान: पार्थिवाचे देणे या पुस्तकातून अनेक मान्यवरांचे अनुभव आणि कर्तृत्व अतिशय समर्पक शब्दात गुंफले आहे. तर मुंबईतील प्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, नवी मुंबई घणसोली येथील डॉ.थोरात, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलाश पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्ती अवयवदान या विषयावरील समाजात जनजागृती वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत.

या लेखाद्वारे आपल्याला अवयवदान या विषयाबाबत आवश्यक ती माहिती मिळालेली असेलच. माझ्यासह माझ्या कर्मचाऱ्यांनी अवयवदानाचा संकल्प केला आहे तर मग चला आपणही अवयवदानाचा संकल्प करु या अन् मरणानंतरही आपल्या अवयवरुपाने जिवंत राहूया. आपले जीवन सार्थकी लावू या..!

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

पान १ वरुन

## आष्टी ते पांडेपोखरी ...

समिती उपसभापती रवींद्र सोळंके माणिकराव वाघमारे प्रदीप ढवळे व्यापारी महासंघाचे कृष्णा टेकाळे, खंडेराव पाटील, बाबाराव थोरात सरपंच शोभा चंद्रकांत मोरे जीवनराव येवले अशोकराव वाघमारे माणिकराव वाघमारे, विष्णू काका शहाणे सुमंत पाटील रामदास काका सोळुंके राजेंद्र बाहेत्ती

माऊली सोळंके, उपसरपंच नसरुल्ला काकड, उद्धवराव गुंजाळ, अमोल जोशी मधुकर मोरे रमेश थोरात श्रीधर गांजाळे गजानन लोणीकर महादेव वाघमारे सिद्धेश्वर केकान नंदकुमार गांजे बंडू मानवतकर बळीराम थोरात बाबा सोळंके, रमेश राठोड रावसाहेब आढें उमेश सोळंके,अल्ताफ कुरेशी सईद शेख, मारुती थोरात बबलू सातपुते रफिक राज असिफ कच्ची, सिताराम राठोड , किरण अंभोरे परमेश्वर केकान नागेश ढवळे अमोल पवार मोहम्मद शेठ जमीनदार दादाभाऊ तौर सुनील तौर यांची उपस्थिती होती.

## विविध राजकीय ...

तुकाराम फुफाटे, यांनीश्र जाहीर प्रवेश घेतला.

यावेळी युवा सेना उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे, शिवसेना उप तालुकाप्रमुख विलास राठोड,शिवसेना शहरप्रमुख पांडुरंग बोराडे, चांद भाई पठाण, युवा सेना तालुकाप्रमुख दीपक गायकवाड, शिवसेना उपशहर प्रमुख दत्तात्रय बोराडे, युवा सेना उपतालुकाप्रमुख विजय चव्हाण, युवा सेना उपतालुकाप्रमुख लिंबाजी बोराडे, खोराड सावंगी सर्कल प्रमुख माऊली वायाळ,सुनील गुंड,सहिद रहीम व इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थीती होती.

## जल जीवन मिशन ...

अभियानाच्या आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. पाटील बोलत होते. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनचे व्यवस्थापकीय संचालक ई. रवींद्रन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जल जीवन मिशनच्या सुधारित प्रशासकीय मान्यता तातडीने देण्याच्या सूचना करीत मंत्री श्री. पाटील म्हणाले, सुधारित मान्यता देऊन या योजनांचे कार्यादेश देण्यात यावे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा संकलनाची वाहने मागणीनुसार देण्यात यावी. कचरा विलगीकरण केंद्र, पर्यावरण अनुकूल कचरा प्रक्रिया केंद्राच्या कामांना गती द्यावी. ग्रामपंचायतींना १५ वा वित्त आयोगातून मिळणाऱ्या निधीतून या घटकांवर खर्च झाला पाहिजे, याबाबत ग्रामपंचायतींना सूचना देण्यात याव्यात. जल जीवन मिशन प्रकल्पातील पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) असलेल्या मे. वॅपकॉस कंपनीने त्यांच्याकडील कामे पूर्ण करावीत.

सार्वजनिक कचराकुंडी, घरगुती कचराकुंडी, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प, सांडपाणी व्यवस्थापन, मैलागाळ व्यवस्थापन या कामांचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## मराठवाडा शिक्षक ...

अधिकाऱ्यांना धारेवर धरते आणि त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेते. यासाठी मुंबई स्थित आणि चालू असलेल्या आंदोलनाला सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी प्रेम दास राहतो मैदानात उतरले. त्यांनी आंदोलनातील शिक्षकांना सक्रिय पाठिंबा दर्शविला व आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. जोपर्यंत या प्रश्नाची तळ जात नाही तोपर्यंत मराठवाडा शिक्षक संघटना मागे वाटणार नाही असे आश्वासनही त्यांनी यावेळेस आंदोलन करताना दिले.मराठवाडा शिक्षक कार्यकारीणी प्रेमदास जी राठोड यांच्या रूपाने मराठवाडा शिक्षक संघटना आझाद मैदानात अवतरली. आंदोलन करताना दिलासा देतानाच त्यांच्या चेहऱ्यावर आपल्या पाठीमागे कोणतीतरी संघटना मजबूत आहे, अशा भावना त्यांनी कार्यकर्त्यांनी त्यांच्याजवळ व्यक्त केल्या. आझाद मैदान मुंबई येथे टप्पा अनुदान बांधवांच्या हुंकार लढ्यात सहभागी !!मराठवाडा शिक्षक संघ नेहमीच टप्पा अनुदानाच्या लढ्यात सक्रिय राहु असा विश्वास त्यांनी दिला.

## मूल्य संस्काराची ...

डॉ. यशवंत सोनुने, कामगार नेते अण्णा सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा. कोरे म्हणाले, की बदलता जमाना आणि मोबाईल व डिजिटल युगात बालकुमारांसमोर जे विश्व आहे, ते मन घडविणारे असेलच असे नाही. अनेकदा नकारात्मक सूर यातून उमटतो, असे सर्व क्षेत्रात वातावरण निर्माण झाले असल्याचे प्रा. कोरे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी विचार मांडत समाजात चांगल्या गोष्टींचा विचार करायचा तर साने गुरुजीचे विचारसाहित्य समजून घेता आले पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमात स्व. दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिन आयोजित जागर श्यामच्या कथांचा' या अभिवाचन उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. अभिवाचन कथा उपक्रमात साने गुरुजींच्या' श्यामची आई' या पुस्तकातील ' वयाने नाही मनाने मोठा हो ! ही कथा बालकुमारांना ऐकविण्यात आली. यावेळी डॉ. प्रकाश इंगळे, अशोक देशमुख, कवी डॉ. प्रभाकर शेळके, विजय सुरासे, पांडुरंग वाजे, डॉ. मधुकर गरड, मधुकर सिनगारे यांच्यासह अनेक नागरिकांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. सुहास सदाव्रते यांनी केले. आभार डॉ. दिगंबर दाते यांनी मानले.

## शेतकऱ्यांचे प्रलंबित ...

लवकरच दिसतील. राज्यात ११ हजार ५०० मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट असल्याने कृषिपंपांना दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यातील अडथळे सप्टेंबरअखेरपर्यंत दूर करण्यात येतील. केंद्रीय पणन, सहकार, कृषीमंत्र्यांची भेट घेऊन राज्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित शेतकरी प्रतिनिधींच्या बैठकीत दिली.

राज्यातील शेतकरी, शेतमजूरांच्या प्रश्नांसदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, पणनमंत्री अब्दुल सत्तार, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह शेतकरी नेते रविकांत तुपकर आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी न घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचधर्तीवर सोयाबीन आणि कापसाच्या निर्यातीलाही परवानगी देण्यात येणार आहे. सोयाबीन व कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. त्यांच्याकडूनही सकारात्मक संकेत मिळाले आहेत. महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पात्र कर्जखात्यांवर बँकस्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे लाभ जमा झालेला नाही तसेच ज्या शेतकऱ्यांना बँकेच्या चुकीच्या माहितीमुळे कमी रक्कम प्राप्त झाली होती, त्यांची माहिती घेऊन लाभाची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पीकविमा संबंधी केंद्रीय कृषिमंत्री यांच्याशी याबाबत चर्चा झाली आहे. विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन याप्रकरणी शेतकरी हिताचा तोडगा काढण्यात येईल. यावर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांच्या व शेतजमीनीच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे. असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

राज्य शासन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात सकारात्मक आहे. केंद्र सरकारकडे शेतीशी संबंधित प्रलंबित अनुदान व कृषीमालाच्या हमी भाव, कांदा निर्यातबंदी व संबंधित प्रश्नांसाठी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. शेतविहीर, ठिंबक-तुषार सिंचनाचे आणि फळबाग व सिंचन अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू आहे. शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार असून सौरऊर्जेवर कृषी पंपाची संख्या वाढविण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. महाडीबीटीअंतर्गत कृषी अवजारांचे अनुदान वितरित करण्यासाठी निधीची तरतूद केली असल्याची माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिली.





मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची सकाळची महाआरती प्रसिध्द उद्योगपती अरुण अग्रवाल व सरला अग्रवाल यांचे हस्ते तर सायंकाळची आरती मर्चंट बैंक चे अध्यक्ष सी ए गोपाल अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र आबड, कार्याध्यक्ष प्रकाश गोरंट्याल, अंकुश राऊत, अनिल सोनी, हेमंत ठक्कर, प्रवीण लाहोटी, वीरेंद्र रूनवाल, प्रदीप मुथा, पवन दुधेडिया, सचिन फुलपगर, उपाध्यक्ष राहुल तालुका, सचिव लकेश अग्रवाल, कोषाध्यक्ष अनुराग बंदुकवाला, कृष्णा देविदान, ॲड. दर्शीत आबड, निखिल आबड, रमेश दलाल, जितेश तालुका, मयूर सावजी, आनंद श्रीमाली, संजय तालुका, दीप आबड, जित आबड, श्रीरंग पटेल आदी. (छाया/जावेद तंबोली)

# मानवी आरोग्यास घातक औषधांचा अमरावतीतून पुरवठा

## एक जण ताब्यात; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** मानवी आरोग्यास घातक असलेले व एनडीपीसी घटक प्रतिबंधीत असलेले गुंगीकारक औषधी व टॅबलेट (गोळ्या) चा मोठा साठा पोलीसांनी नुकताच जप्त केला होता. यात जालन्यातील दोन मेडीकल चालकांसह अकोल्यातील एकाला पोलीसांनी ताब्यात घेतले होते त्यानंतर आता अमरावती येथील पुरवठादार कपिल साहू यास ताब्यात घेतले आहे. ही कारवाई गुन्हे शाखेच्या पोलीसांनी केली.

जालना शहरात नशेच्या गोळ्या विकण्याचे प्रमाण वाढले आहे. त्या बटन गोळ्याची विक्री करणाऱ्या दोन मेडिकल चालकाविरोधात जालना स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी सात सप्टेंबर रोजी कारवाई केली होती. त्यानंतर याच प्रकरणात आता पोलिसांनी अमरावती येथील औषधी पुरवठादार कपिल साहू यांना देखील अटक केली आहे. अमरावती येथून जालना शहरात अवैध गर्भपात करण्यासाठी गर्भपाताच्या गोळ्या, नशेच्या गोळ्या तसेच सेक्स वाढवण्याच्या गोळ्या येत असल्याचा धक्कादायक प्रकार या तपासात समोर आला आहे. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी संतोष बाळासाहेब जाधव, दर्शन मेडिकल जालना, राहुल भागाजी गायकवाड विराज मेडिकल जालना आणि उद्धव शिवाजी पठारे तसेच सागर आठवले अकोला यांना ताब्यात घेतलं होते. त्यानंतर पोलिसांनी आता अमरावती येथील पुरवठादार कपिल साहू याला देखील ताब्यात घेतल आहे.

या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी ८ लाख १८ हजार ४०० रुपयांचा औषधी साठा जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागिय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, रुस्तुम जैवळ, कैलास खर्डे, हजारे, भाऊराव गायके, रमेश राठोड, प्रशांत लोखंडे, सागर बाविस्कर, महिला पोलीस नाईक चंद्रकला शडमल्लू, संदीप चिंचोले, किशोर पुंगळे, सचिन राऊत,योगेश सहाने, गणपत पवार, रमेश पैठणे आदींनी केली.

# छत्रपती संभाजीनगर येथे प्रकल्प अधिकारी म्हणून चेतना मोरे यांची नियुक्ती




**परतुर । प्रतिनिधी -** आदिवासी प्रकल्प कार्यालय संभाजीनगर येथे नुकत्याच जात पडताळणी विभाग संभाजीनगर येथील चेतना मोरे यांची आदिवासी प्रकल्प कार्यालय संभाजीनगर येथे प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.या नियुक्तीचे स्वागत करण्यासाठी ड.सुरेश काळे. व पारधी समाजातील नागरिक शंकर बाजीराव चव्हाण, गोपाल रामा काळे,शेषराव माणिक चव्हाण उपस्थित होते. नियुक्ती झाल्याबद्दल शेषराव माणिक चव्हाण यांनी श्रीमती चेतना मोरे यांचा हार श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. व आदिवासी समाजाची जास्तीत जास्त कशी प्रगती होईल यासाठी शुभेच्छा दिल्या.त्याचप्रमाणे प्रभारी सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून कदम यांची सुद्धा नियुक्ती झाली. त्याबद्दल शंकर बाजीराव चव्हाण यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या या निमित्ताने ड.सुरेश काळे व समाज बांधवांनी प्रकल्प अधिकारी यांच्याशी संवाद साधला या प्रसंगी विद्यार्थी , बालक , प्रौढ यांना योजनेमध्ये बसून त्यांचा आर्थिक निकष कसा वाढवता येईल याच्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

# आदर्श शिक्षक पुरस्काराने दिलीप जाधव सन्मानित



**सांगली -** स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ व महाराष्ट्र राज्य मंत्रालय समन्वय समिती, मुंबई यांच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्याचे राज्य कोषाध्यक्ष प्रा. दिलीप आनंदराव जाधव यांना सोलापूर जिल्हा जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते हा पुरस्कार सोलापुरातील केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बापूसाहेब आडसूळ ,सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनिष काळे, सहाय्यक पोलिस उपायुक्त राजन माने, आदी उपस्थित होते.

# जनसेवा ग्रुपतर्फे गणेश भक्तांना वाटप होणार ४ क्विंटल जिलेबी व १५ हजार कचोरी - मोतीवाला





**जालना । प्रतिनिधी -** येथील जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरातील राजेंद्र प्रसाद रोडवरील रोहीत इलेक्ट्रॉनिक समोर गणेश भक्तांना प्रसाद स्वरूपात शुद्ध तुपातील ४ क्विंटल केसर जिलेबी आणि १५ हजार शेगाव कचोरीचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री. मोतीवाला यांनी सांगितले की, बडीसडकवरील गणेशोत्सव हे जालना जिल्ह्याचे विशेष आकर्षण आहे. गणपती आणि देखावे पाहण्यासाठी गणेशोत्सवाच्या शेवटचे चार दिवस तुफान गर्दी असते. दररोज किमान २५ ते ३० हजार गणेश भक्त येतात. त्यांच्यासाठी जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत इंदौरच्या प्रसिध्द शुध्द तुपातील केसरयुक्त ४ क्विंटल जिलेबीचे वाटप केले जाणार आहे. इंदौर येथील कारागीर जालन्यात येवून ही जिलेबी तयार करणार आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ सप्टेंबर रोजी याच ठिकाणी सायंकाळी ७ ते १० या वेळेत ग्रुपचे सदस्य तथा सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांच्यावतीने आयएसओ प्रमाणित, स्वादिष्ट व पौष्टिक १५ हजार शेगाव कचोरीचे वाटप करण्यात येणार आहे. भाविक-भक्तांनी सात स्वरूपातील जिलेबी आणि कचोरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला यांच्यासह उपाध्यक्ष सुनील लाहोटी, सचिव डॉ. रामनारायण जैस्वाल, कोषाध्यक्ष गोवर्धन अग्रवाल, पन्नालाल बगड़िया यांनी केले आहे.

सण आणि उत्सव हे भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान आहेत. त्यात प्रसादाला तेवढेच महत्त्व आहे. त्यामुळेच प्रत्येक गणेशोत्सवात जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने गणेश भक्तांना प्रसाद स्वरूपात स्वादिष्ट कचोरी आणि जिलेबी वाटप करण्यात येते. प्रसाद वाटप करताना मनाला एक वेगळाच आनंद निर्माण होतो. आत्मिक समाधान लाभते. बाप्पांचे दर्शन घेतल्यावर जो आनंद मिळतो तोच आनंद हा प्रसाद करताना मिळतो. हे काम जनसेवा ग्रुपच्या माध्यमातून अखंडितपणे सुरू राहील, असे ग्रुपचे सदस्य पन्नालाल बगडिया म्हणाले.

# जेईएसमध्ये शिक्षक दिन साजरा



**जालना । प्रतिनिधी -** जेईएस महाविद्यालय जालना येथे इंग्रजी विभागातर्फे इंग्लिश क्लबने रेट्रो थीम सह एक संस्मरणीय शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला, होता. यामुळे महाविद्यालयीतील शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेची आणि कृतज्ञतेची जाणीव झाली.

५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनाच्या झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयच्या सभागृहाला एक आकर्षक रेट्रो वातावरण तयार करून सजवलं होतं, कु. निकिता गोरेने तयार केलेला सेल्फी कॉर्नर देखील होता. शिक्षकांना निखिल तलरेजाने वैयक्तिकरित्या आमंत्रित केले होते आणि त्यांना शिक्षक दिनाचा आनंद मिळावा अशी विद्यार्थ्यांची भुमिका होती.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. अग्निहोत्री, उपप्राचार्य प्रा. डॉ. सदावर्ते, प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक प्रा. वासनिक, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. भाग्यश्री बियानी आणि प्रा. मनोज महेर प्रा डॉ राजेंद्र सोनवणे उपस्थित होते. विद्यार्थी प्रतिनिधी कु. गौरी भोगावणकर हिने आपले मनोगत व्यक्त केले यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांनी शिक्षक दिनाच्या विद्यार्थीसह ,प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्यात., कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु . संजना व अनाम यांनी केले.उपस्थितांचे आभार संदेशन करिया यांनी मानलेत.

या कार्यक्रमात उपस्थित प्राध्यापकांना स्मृती चिन्ह व गुलाब पुष्प देवून सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

# धार्मिक अल्पसंख्याक शाळांनी अनुदान योजनेसाठी १५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई उपनगरातील धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षासाठी अल्पसंख्याक बहुल शाळांनी १५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शाळांनी विहीत नमुन्यात अर्ज करावेत. संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ७०% व अपंग शाळांमध्ये ५०% विद्यार्थी हे अल्पसंख्याक समुदायातील असणे अनिवार्य आहे. तसेच, संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना शासनाकडून मान्यता मिळालेली असणे आवश्यक आहे. स्वंय-अर्थसहाय्यित शाळा सदर योजनेसाठी पात्र असणार नाहीत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे.

# मुस्लिमांनी भीतीच्या मानसिकतेतून बाहेर पडून हौतात्म्याच्या भावनेत वाहून घ्यावे

## वाहदत-ए-इस्लामी हिंद आयोजित मानवतेचा आदर मोहिमेत मौलाना फलाही लखनौ यांचे वक्तव्य



**जालना । प्रतिनिधी -** वाहदत-ए-इस्लामी हिंद जालना आयोजित उमर फारूक मस्जिद, दुखी नगर येथे मानवता अभियानाच्या अंतर्गत १ रबी-उल-अव्वाल ते २९ रबी-उल-अव्वाल पर्यंत मानवतेचा आदर मोहीम अंतर्गत जाहीर भाषणाचे

सुरुवात इमाम व खतीब उमर फारूक मस्जिद, दुखी नगर, जुना जालना मौलाना आमीर फहीम यांनी कुराण पठण केले यावेळेस मौलाना अब्दुल अलीम फलाही म्हणाले स्वत ओळखा आणि अल्लाहच्या सृष्टीवर नजर ठेवा हे काय आहे, त्याने मनुष्याला त्याच्या स्वतः च्या हातांनी तयार केले, म्हणून त्याने मनुष्याला पृथ्वीवर पाठवले आणि दैवी व्यवस्था खिलाफत अला मिन्हाज-उल-नबवाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी ज्ञान दिले गेले म्हणून, ज्याला गुलामगिरीचे जीवन हवे आहे, ते अज्ञानी आहे, म्हणून अल्लाहने इतर प्राण्यांना बोलण्याची आणि व्यक्त करण्याची क्षमता वंचित ठेवली आहे विवेकबुद्धी फक्त माणसालाच दिली गेली आहे, पण ही देणगी आणि सर्व क्षमता असूनही, माणूस बहुदेवतेच्या शापाने त्रस्त आहे, तर कोणताही प्राणी दुसऱ्या प्राण्याला साष्टांग दंडवत नाही जोपर्यंत बनी इस्रायलमध्ये पैगंबरांची मालिका चालू होती, तोपर्यंत बनी इस्रायलचे राजकारण पैगंबरांच्या हातात राहिले, अल्लाहने अल्लाह ची गुलामगिरी स्वीकारण्यासाठी पैगंबराना पाठवले होते आणि अल्लाहचा मेसेंजर, शांती आणि आशीर्वाद असू द्या, त्याने जगाला न्यायाची आवश्यकता दिली आणि मुहम्मद मुस्तफा, त्याच्यावर शांती असो, त्याने आदामचे ऐक्य घोषित केले आणि तो, त्याच्यावर शांती असो, तो पहिला होता. जगाला समान बनवण्यासाठी त्यांनी मानवी हक्कांचा सार्वत्रिक आणि कायमस्वरूपी जाहीरनामा दिला, म्हणून जेव्हा इस्लाम प्रबळ झाला, तेव्हा ज्ञान हे मानवाचे रक्त शोषण्याचे साधन बनले आहे जगामध्ये न्याय आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी मुस्लिमांना आता भीतीच्या मानसिकतेतून बाहेर पडावे लागेल आणि हुतात्माच्या भावनेला झोकून द्यावे लागेल, असा जागतिक जाहीरनामा देण्यात आला सर्व पूर्वग्रह दूर केले आहेत. यावेळेस डॉक्टर निसार देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर चे भाषण झाले सूत्रसंचालन आणि आभार लियाकत अली खान यासिर यांनी व्यक्त केले.

# परतूरात महालक्ष्मीचा उत्साह




**परतूर । प्रतिनिधी -** शहर व परिसरात महालक्ष्मी सणाचा उत्साह दिसून आला. घरोघरी गौराईचे मंगळवार (दि १०) आवाहन करण्यात आले होते. बुधवार (दि ११) रोजी भोजन तर आज गुरुवार (दि १२) रोजी विर्सजन करण्यात येणार आहे.

परतूर येथे मोठ्या उत्साहात गौराईला पुर्ण आदराने पुजा करुन जेवू घातले. यावेळी मोठी सजावट करण्यात आली होती. नितेश रामेश्वर खरात यांच्या घरी मोठ्या उत्साहात सण साजरा करण्यात आला.

# ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा - आमदार लोणीकर

## प्रवास खर्चासाठी प्रतिव्यक्ती ३० हजार रुपये राज्य सरकार देणार

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना शासनाने मोठी आनंदाची बातमी दिली आहे. ज्येष्ठांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना राबवण्याचे नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री यांनी घोषित केले आहे. परतूर विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. देशातील मोठ्या तीर्थ यात्रांना जाऊन मनःशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुखकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेच्या माध्यमातून मिळणार राज्यातील व भारत देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला असून, सदर योजनेअंतर्गत निर्धारित तीर्थक्षेत्रापैकी एका यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एक वेळ लाभ मिळणार आहे, तसेच प्रवास खर्चासाठी कमाल मर्यादा प्रतिव्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहणार आहे. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इत्यादी बाबींचा समावेश असेल. लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार असावे. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व वय वर्षे साठवरील ज्येष्ठ नागरिक असावा. अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयातून प्रसिद्धी देण्यात आलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. या पत्रकात पुढे म्हटले आहे की सदर योजनेचा लाभ मिळविण्या साठी ऑनलाईन अर्ज सादर करावे लागणार आहेत. सदर योजनेअंतर्गत विविध दळणव- ळणाच्या साधनांद्वारे प्रवासाचे आयोजन करण्यासाठी अधिकृत टुरिस्ट कंपन्या तसेच खठउढउ किंवा समकक्ष अधिकृत असलेल्या अधिकृत कंपन्यांची निवड विहित नियमांचे निविदा प्रक्रियेचे पालन करुन करण्यात येणार आहे. प्रवाशांची निवड जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात कोटा निश्चित करण्यात येऊन प्राप्त झालेल्या अर्जाच्या उपलब्धतेनुसार लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड करण्यात येणार आहे. ७५ वर्षांवरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल.



# पहाट फाऊंडेशनचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार विनोद कळंबे यांना जाहीर

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** पहाट फाऊंडेशन छत्रपती संभाजीनगर च्या वतीने उत्कृष्ट शैक्षणिक व सामजिक कार्यासाठी देण्यात येणारा पहाट राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार टेंभुर्णी येथील युगंधर प्रतिष्ठान चे अध्यक्ष तथा जाफराबाद तालुका जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विनोद कळंबे यांना जाहीर झाला आहे.स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.श्री विनोद कळंबे हे खानापूर जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.ग्रामस्थांचे सहकार्य व लोकसहभाग या माध्यमातून खानापूर शाळेचा कायापालट करण्याचे काम त्यांनी केलेले आहे.याशिवाय युगंधर प्रतिष्ठानच्या माध्यमातून शेकडो कोरोना योध्यांचा सन्मान,ऊसतोड मजुरांच्या फडावर दिवाळी,शेकडो गरजू रुग्णांना आर्थिक मदत यासह पदवीधर युवकांसाठी घरपोच पदवी अभियान असे अनेक सामजिक उपक्रम त्यांनी राबविले आहे त्यांना सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जाफराबाद तालुक्यातील सर्व स्तरातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.शनिवारी ता.१४ छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या समारंभात त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



# विकास कामांचे भास्कर दानवे यांच्या हस्ते उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील शिवाजीनगर येथील काशी विश्वेश्वर महादेव मंदिर, म्हाडा कॉलनी येथे माजी केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांचे लोकार्पण व भुमिपुजन सोहळा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या हस्ते पार पडला. मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत यावेळी झालेल्या कामाचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच यावेळी बोलताना भास्करआबा दानवे यांनी,मंदिरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात, लग्न होत असतात म्हणून या ठिकाणी स्वयंपाकासाठी शेड आणि २ रूम ची आवश्यकता होती तेव्हा मा रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नातून मंदिरासाठी दोन रुम व किचन शेडचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे याचे आज भूमिपूजन करण्यात येत आहे आणि लवकरच हे काम देखील पूर्ण होईल असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, कपिलजी दहेकर, बाबुराव आंबेकर, जुगलशेठ भूक्कड, बबनराव जाधव, दत्ता जाधव, ज्ञानेश्वर मानवतकर, गणेश आढाव, विष्णू सांगोळे, गणेश जीरेकर, दीपक शिंदे, पुंडलिकराव गाडेकर, विलास पवार, रावसाहेब काकडे, हिवाळे साहेब, शिवाजीराव खरात, पंडित सर, प्रसाद काकडे, विनायकराव जगताप, हजारे सर, नारायण काकडे, महामुनी, सूरा सर, गणेश आंबेकर , योगेश नागरे, राजकुमार कुमावत, संजय सावजी, सत्तूशेठ काबरा, अमोल निंबळकर, बळीराम पवार, हुडसे सर, अर्जुन इंगळे, भाऊसाहेब कोलते, लोंढे साहेब, गोवर्धनजाधव, ज्ञानेश्वर सुसर, रामेश्वर आंबेकर, प्रदीप मिसाळ, गणेश साबळे, शिवाजीराव साळुंके, डिगोले सर ,प्रदीप देशमुख व कॉलनीतील व प्रभागातील अनेक रहिवासी नागरिक उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.